# मिरा भाईंदर महानगरपालिका

## माहिती व जनसंपर्क विभाग

## प्रेसनोट

- **मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील हवेची गुणवत्ता सुधारण्यासाठी शहरातील विकासकांनी मा. आयुक्त यांच्या निर्देशानुसार विविध उपाययोजनांची अंमलबजावणी करण्याच्या सक्त सूचना**

मा. उच्च न्यायालयाच्या सूचनेनुसार मिरा भाईंदर महानगरपालिका मा. आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.) यांनी महापालिका क्षेत्रातील हवेची गुणवत्ता सुधारण्यासाठी तातडीने विभागप्रमुखांची आढावा बैठक घेत आवश्यक ते निर्देश दिले आहेत. त्या अनुषंगाने नगररचना विभागाने शहरातील विकासक, वास्तूविशारद यांना हवेची गुणवत्ता सुधारण्यासाठी सहकार्य करण्याकरिता मा. आयुक्त यांच्या निर्देशानुसार आदेश निर्गमित केले आहेत.

हवेची गुणवत्तेची पातळी उंचावण्यासाठी सर्व विकासकांनी बांधकाम सुरू असलेल्या ठिकाणी उंच भिंत किंवा पत्रा शेड उभारण्याच्या सूचना दिल्या आहेत. इमारतीचे बांधकाम सुरू असलेल्या ठिकाणी अपघात प्रतिबंधक ग्रीन नेट लावणे, पाणी फवारणी यंत्र बांधकाम परिसरात उभारून कार्यान्वित करणे, बांधकाम सुरू असलेल्या साईट वरून बाहेर येणाऱ्या गाड्यांचे टायर स्वच्छ करण्यासाठी यंत्रणा बसविणे, बांधकामाच्या ठिकाणी साहित्य लोडींग/अनलोडींग करताना वॉटर फॉगिंग करणे, बांधकामाच्या वेळी साहित्य वाहून नेणाऱ्या गाड्या या बंदिस्त असाव्यात, साहित्य वाहून नेणाऱ्या वाहनांचे वैध PUC प्रमाणपत्र असणे बंधनकारक करणे, महापालिका कार्यक्षेत्रात कोणत्याही परिसरात उघड्यावर कचरा जळण्यास सक्त मनाई राहील याबाबतचे आदेश सर्व विकासक व वास्तू विशारद यांना देण्यात आले आहेत. सदर आदेशांची तातडीने अंमलबजावणी न झाल्यास सदर विकासकांना "STOP WORK" चे आदेश निर्गमित केले जातील अशी सक्तीची सूचना मा. आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.) यांनी दिली आहे.